**पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**दिनांक 10/01/2019 (गुरूवार)**
**(दुपार)**

---

## नुकसान

पो.स्टे. उमरेड :- अंतर्गत 05 कि.मी अंतरावर मौजा चिचोली शिवार उमरेड येथे दिनांक 09/01/2019 चे 15:30 वा. दरम्यान फिर्यादीचा नौकर नामे- मंगेश कुशराम, रा. नवेगाव साधु हा मौजा चिचोली शिवारातील कोठयातील 27 बकऱ्या चिचोली शिवारात चारण्यासाठी घेवून गेला होता. दरम्यान अज्ञात आरोपीने रेल्वे लाईनच्या जागेवर थिमेट, मिठ, गहु टाकल्याने बकऱ्यांनी ते चरल्याने त्या बकऱ्यांपैकी 13 बकऱ्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे फिर्यादीच्या 13 बकऱ्या एकुण किं. 96,000/-रू चे नुकसान झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- चंद्रशेखर उर्फ सुनिल नारायणजी पाटील, वय 43 वर्ष, रा. बालाजी नगर, उमरेड यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 429 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार भगवान यादव हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :- अंतर्गत 03 कि.मी अंतरावर कोळसा डेपो, टाकळघाट फाटा येथे दिनांक 09/01/2019 चे 03:30 वा. ते 03.45 वा. दरम्यान शिवपुजन संतोष उपाध्याय(क्लीनर), वय 20 वर्ष, रा. कामगार नगर उप्पलवाडी नागपुर हा टाकळघाट फाटा वर्धा रोड येथील कोयला ट्रपींग याड येथे एमएच-40/एके-3485 क्रमांकाच्या ट्रकमध्ये कोळसा लोड करीत होता. दरम्यान कोळश्यावर ताडपत्री टाकत असतांना अचानक त्याचा तोल गेल्याने ट्रकवरून खाली जमिनीवर तोंड आणि डोक्याच्या भारावर पडलाने संतोष उपाध्याय यास उपचारकामी माया हॉस्पीटल मध्ये नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- बिमलेश त्रिलोकनाथ तिवारी, वय 40 वर्ष, रा. कामगार नगर गुरूनानक कॉलेजच्या मागे उप्पलवाडी, नागपूर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार बन्सोड हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर मौजा कुजबा आम नदी शिवार येथे दिनांक 09/01/2019 चे 18:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– धनराज ताराचंद गौरखेडे, वय 42 वर्ष यांचा मोठा साळा नामे– मंगेश मनोहर कान्हेकर(मृतक), वय 45 वर्ष, रा. केसलावाडा हा कावीळ या बिमारीने आजारी होता. त्याचा गावठी उपचार सुरू होता. मृतकाची बहिन 09.00 वा. च्या सुमारास शेतात गेली होती व सायंकाळी ती शेतातुन परत आल्यानंतर मृतक घरी दिसून आला नाही. फिर्यादी व गावातील लोक कुजबा शिवारातील मृतकाचा शोध घेणे करीता गेले असता सायंकाळी 18.30 वा. दरम्यान तो आम नदीच्या किनारी सागवनच्या झाडाला गळफास घेतल्यानंतर मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. वेलतुर येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार मधुकर सुरपाम हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर